ADJ.NO	20	2024
Page/	22	36

टनन – २
दस्त क्रमांक-८७३/२०२४
३५/ १८०

अनामत परत मिळणेबाबत अर्ज करणे व आवश्यक त्या सर्व पूर्तता करून अनामत रक्कम परत मिळविणे.

५.११ सदर मिळकतीमधील प्रस्तावित प्रकल्पाचे फेजेस निश्चित करणे सर्व फेज करीता एकत्र अथवा स्वतंत्र प्रकल्प निर्धारित करून त्याप्रमाणे महारेरा प्राधिकरणाकडून-नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे. महारेरा प्राधिकरणाकडे रेरा अधिनियमाचे तरतुदीनुसार नियमित मसुद्यामध्ये आवश्यक प्रतिज्ञापत्र, घोषणापत्र व इतर अनुषंगीक दस्त लिहून देणार यांचेवतीने निष्पादीत करून सादर करणे. महारेरा प्राधिकरणाकडे प्रकल्प नोंदणी, मुदत वाढ, दुरूस्ती व इतर सर्व अनुषंगीक बाबींकरीता अर्ज, अपील, रिव्हीजन इत्यादी दाखल करणे. लिहून देणार यांचे प्रतिनिधी व मुखत्यार म्हणून प्राधिकरणामध्ये आवश्यक जाबजबाब देणे व इतर कायदेशीर पुर्तता करणे.

अनुच्छेद ६ : लिहून देणार यांचे हक्क व जबाबदाऱ्या

६.१ सदर मिळकतीपोटी निश्चित झालेला मोबदला लिहून देणार यांना मुदतीत प्राप्त करण्याचा हक्क आहे. लिहून घेणार यांनी सदरची मिळकत विकसना करिता स्वत:चे जबाबदारीवर घेतली असल्याने मिळकतीचे विकसनामुळे निर्माण होणाऱ्या सर्व देयता व कर भरण्याची जबाबदारी लिहून घेणार यांचीच राहिल. तथापि प्रस्तुत करारापोटी लिहून देणार यांना देय होणारे आयकर व अन्य अनुषंगीक कर हे लिहून देणार यांनीच अदा करावयाचे आहेत. सदर मिळकतीमध्ये विकसन करतांना निर्माण होणाऱ्या इतर सर्व आर्थिक जबाबदाऱ्याची पुर्तता हि लिहून घेणार यांनीच करावयाची आहे. त्याबाबत लिहून देणार यांना कोणत्याही प्रकारे जास्ती देणी अदा करावयास लागल्यास त्याची परत फेड लिहून घेणार यांनी तात्काळ करून द्यावयाची आहे.

६.२ सदर मिळकतीचे स्वामित्व हक्क व प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकाराची हस्तांतरक्षमता बाधीत होईल असे कोणतेही कृत्य लिहून देणार हे करणार नाहीत व

मालती नरेश पाटील

ADJ.NO	20	2024
Page/	22	36

ट न न
दस्त क्रमांक ९३७३/२०२४
३८/९६०

सदरची मिळकत लिहून घेणार अथवा त्यांचे नॉमिनीज चे लाभात मिळकत अंतिमत: हस्तांतरीत होई पावेतो निर्वेध व बोजाविरहीत अशी ठेवतील. सदर मिळकतीचे स्वामित्व हक्काबाबत कोणत्याही प्रकारचा दोष निर्माण झाल्यास अथवा प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकारांचे हस्तांतरणाकरीता लिहून देणार व त्यांचे कुटूंबियांचे सहकार्याची आवश्यकता भासल्यास लिहून देणार व त्यांचे कुटूंबिय हे लिहून घेणार यांना सर्व पुर्तता विनातक्रार व विगामोबदला करुन देतील.

६.३ सदर मिळकतीचे विकसन / हस्तांतरणाकामी तसेच प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकारांचे हस्तांतरणाकामी आवश्यक असणाऱ्या परवानग्या मिळविण्याकरिता लिहून देणार यांना संबंधीत कार्यालयांमध्ये समक्ष हजर राहणे गरजेचे असल्यास लिहून देणार निर्धारित समयी हजर राहून आवश्यक ते जाबजबाब व इतर तांत्रिक पूर्तता करुन देतील व संबंधीत परवानग्या मिळविण्याकरिता आवश्यक ते सर्व सहकार्य करतील. सदर मिळकतीचे विकसन/हस्तांतरणाकामी तसेच प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकारांचे प्रमाणपत्र मिळविण्याकामी, हस्तांतरणाकामी आवश्यक असणाऱ्या परवानग्या मिळविण्याकरिता लिहून देणार यांना जाबजबाब अथवा अन्य दस्तऐवज लिहून व/अथवा नोंदवून देणे गरजेचे असल्यास अथवा अन्य कोणत्याही पुर्तता करणे गरजेचे असल्यास लिहून देणार अशा पूर्तता निर्धारित वेळेत पूर्ण करुन देतील.

६.४ सदर मिळकतीचा मोबदला लिहून देणार यांनी आपसात कौटूंबिक व्यवस्थेनुसार परस्पर समजूतीने व हिंदू कायद्याचे तरतुदीस अनुसरुन वाटून घ्यावयाचा आहे/उपयोगात आणावयाचा आहे. सदरचा मोबदला लिहून देणार यांनी आपसात वाटून घेताना वाद निर्माण झाल्यास त्याचे त्वरित निराकरण करावयाचे असून त्याची कोणतीही जबाबदारी लिहून घेणार यांची राहणार नाही तसेच लिहून देणार यांचे दरम्यान अंतर्गत वाद उपस्थित झाल्यास मिळकतीच्या विकसनाची अथवा

ADJ.NO	२०	2024
Page/	२४	३७

टनन – २
दस्त क्रमांक ९४७३/२०२४
३७/१८०

हस्तांतरणाची प्रक्रिया थांबविण्याचा लिहून देणार यांना कोणताही हक्क व अधिकार राहणार नाही.

६.५ सदर मिळकतीबाबत अगर प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकाराबाबत कोणताही वाद संबंधीत न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात दाखल झाल्यास/प्रलंबित असल्यास लिहून देणार वेळोवेळी समक्ष हजर राहून संबंधीत वादाचे निराकरण करण्याकामी करुन देतील व लिहून घेणार यांचे हक्क व अधिकारांचे सुरक्षिततते करिता आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करतील.

६.६ सदर मिळकतीचे/मिळकतींच्या हिस्स्यांचे/त्यावरील बांधीव भागांचा अंतिम हस्तांतरण दस्त तसेच सदर मिळकतीमधील काही क्षेत्रासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावीत हस्तांतरणीय विकास अधिकारांचे हस्तांतर दस्त लिहून देणार हे लिहून घेणार यांचे अथवा त्यांचे नॉमिनीजचे नावे लिहून व नोंदवून देतील.

६.७ या कराराचे उद्देशाची पूर्तता करणेसाठी ज्या ज्या ठिकाणी लिहून देणार यांच्या सह्यांची, संमतीची व उपस्थितीची जरुरी असेल त्या त्या ठिकाणी लिहून देणार हे स्वत: सर्व गोष्टींची पुर्तता करुन देतील.

अनुच्छेद ७ : लिहून देणार यांचेद्वारे उद्घोषणा व हानीरक्षण बंधपत्र :

लिहून देणार अंगीकारतात, जाहिर करतात व हानि रक्षण बंधपत्र लिहून देतात ते खाली प्रमाणे:

७.१ सदर मिळकत ही लिहून देणार यांचे मालकीची व कब्जा उपभोगातील अशी असून मिळकतीमध्ये इतर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही. सदर मिळकतीवरील लिहून देणार यांचे हक्क हितसंबंध हे निर्वेध आहेत अशी खात्री देत असुन सदर मिळकतीवर लिहून देणार यांचे खेरीज अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. मात्र असा हक्क कोणी सदर मिळकतीवर प्रतिपादन केले तर त्याचे निवारण लिहून

ADJ.NO	२०	2024
Page/	२५	३७

देणार हे स्व:खर्चाने करुन देतील. त्याची तोषीस लिहून घेणार, अगर मिळकतीस लागू देणार नाही.

टनन – २
दस्त क्रमांक ९४७/२०२४
३५/१८०

७.२ सदर मिळकतीवर कोणतीही जडजोखीम नाही. सदर मिळकत साठेखत करारनामे, खरेदीखते, डेव्हलपमेंट करारनामे, जनरल मुखत्यारपत्र, भाडेकरार, हस्तांतर, लिज, ट्रस्ट, अन्नवस्त्र, हवा उजेड घेण्याचा हक्क, जाती, गहाण तारण, लिव्ह लायसेन्स करार, तोंडी करारनामे, अन्य कोणत्याही प्रकारचे दस्तऐवजान्वये जडजोखमीत गुंतवलेली नाही.

७.३ सदर मिळकतीमध्ये लिहून देणार यांचे स्वामित्व हक्कांमध्ये कोणत्याही प्रकारचा दोष उपस्थित झाल्यामुळे लिहून घेणार यांचे कोणतेही नुकसान झाल्यास लिहून देणार झालेल्या हानीची भरपाई करतील.

७.४ लिहून देणार जाहिर करतात व अंगीकारतात की लिहून देणार यांनी सदर मिळकती मध्ये कोणतेही त्रयस्थ हक्क व अधिकार निर्माण केलेले नाहीत. लिहून देणार यांचे वतीने कोणत्याही त्रयस्थ इसमाने हक्क व अधिकार प्रतिपादीत केल्यास त्याचे निवारण करण्याची व त्याकरिता लिहून घेणार यांस हानिरक्षीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांची राहिल.

अनुच्छेद ८ : विकासकांद्वारे उद्घोषणा व हमी :

८.१ महाराष्ट्र सदनिकांचे मालकी हक्क अधिनियम १९६३ व स्थावर संपदा (विकास व विनियमन) अधिनियमाचे तरतुदीनुसार विकासक म्हणून आवश्यक त्या सर्व जबाबदाऱ्या विकासकांनी पूर्ण करावयाच्या आहेत. सदर मिळकतीमध्ये नवीन प्रस्तावित बांधकामाचा व सोयीसुविधांचा दर्जा योग्य राहील याची खबरदारी विकासकांनी घ्यावयाची आहे. सदर मिळकतीमध्ये बांधकाम करतेवेळी सुरक्षेचे व कामगारांबाबतचे सर्व नियम काटेकोरपणे पाळले जातील याची दक्षता विकासक घेतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विकासकांचीच राहील.

मालती नरेश पाटील

मेघना-यु-पाटिल

ADJ.NO	२०	2024
Page/	२६	३७

८.२ स्थावर संपदा (विकास व विनियमन) अधिनियमाचे तरतुदीनुसार प्रकल्प नोंदणी करीता आवश्यक पूर्तता करण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील. लिहून देणार क्र. १ ते ३ यांनी एकत्रितरित्या आपल्या हिश्श्याचे बांधीव क्षेत्राचे वितरण स्विकारण्याचा व विक्री करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे लिहून देणार क्र. १ ते ३ हे संयुक्तरित्या सहविकासक म्हणून सर्व कायदेशीर पूर्तता करतील. त्याचप्रमाणे लिहून देणार क्र. ४ ते ६ यांनी एकत्रितरित्या आपल्या हिश्श्याचे बांधीव क्षेत्राचे वितरण स्विकारण्याचा व विक्री करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे लिहून देणार क्र. ४ ते ६ हे संयुक्तरित्या सहविकासक म्हणून सर्व कायदेशीर पूर्तता करतील.

ठाणे — २
दस्त क्रमांक ९३७३/२०२४
३१/१०

८.३ सदर मिळकतीमधील प्रस्तावित बांधकामापैकी विक्रीलायक क्षेत्राच्या खरेदीदारांसमवेत करार करण्याचा सर्वस्वी अधिकार लिहून घेणार/विकासक यांना आहे. तथापि, लिहून देणार यांना प्रस्तुत दस्तांनुसार प्राप्त झालेल्या हक्क व अधिकारांस विपर्यस्त कोणतेही करार अगर पत्रव्यवहार लिहून घेणार/विकासक करणार नाहीत. त्याचप्रमाणे स्वामित्व हक्कामधील दोष वगळता अन्य कोणत्याही कारणांकरिता संबंधीत ग्राहकांनी प्रचलीत नियमानुसार तक्रार केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी लिहून घेणार/विकासक यांचीच राहील.

Stamps Thane (City)

THE SEAL OF THE SUB - REGISTRAR

अनुच्छेद १ : ताबा :

सदर मिळकतीपैकी लिहून देणार यांनी रहिवासाकरीता राखून ठेवलेली इमारत म्हणजेच १२१.०२ चौरस मीटर क्षेत्रामध्ये बांधण्यात आलेल्या साईराज या नावाने ओळखण्यात येणाऱ्या बंगल्याचे क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्राचा ताबा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना प्रस्तुत करार लिहून व नोंदवून देते वेळी मिळकतीवर जाऊन, हद्दी व खुणा दाखवुन, क्षेत्राची खात्री पटवून लिहून घेणार यांस सुपूर्द केलेला आहे. यापुढे सदर मिळकतीचा ताबा लिहून घेणार यांचेकडेच राहिल

मालती नरेश पाटील

मधुका-कु. पाटील

ADJ.NO	20	2024
Page/	२७	३७

त्याबाबत लिहुन देणार अथवा त्यांचे मार्फत हक्क सांगणारे इसम कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही.

अनुच्छेद १० : विनिर्दिष्ट अनुपालन आणि विवाद :

ट न न – २
दस्त क्रमांक ९४३/२०२४
१० / १८०

१०.१ सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार यांनी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवलेले आहे व भविष्यात देखील लिहून घेणार यांस वेळोवेळी भांडवल गुंतवणुक करावी लागणार आहे. विकासकांनी/लिहून घेणार यांनी प्रकल्पाचे नियोजनाचे काम सुरु केले आहे व सदर मिळकत **श्री मारूती हाईट्स** प्रकल्पाचा एक भाग अथवा टप्पा (Phase) म्हणून विकसीत करण्यात येणार आहे.

१०.२ प्रस्तुत करारामध्ये नमुद केलेल्या कोणत्याही तरतुदींचा कोणाही पक्षाने भंग केल्यास, अन्य पक्ष कसूरवार पक्षास होणारा कसूर व त्याचे अपेक्षित निराकरणाबाबत लेखी स्वरुपात सुचना देईल. मुदतीमध्ये कसूरवार पक्षाने आवश्यक पुर्तता न केल्यास अन्य पक्ष प्रस्तुत कराराचे विनिर्दिष्ट अनुपालनाकरिता (Specific Performance) करिता दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार राहील.

अनुच्छेद ११ : संकीर्ण :

११.१ सदरचा करारनामा हा सर्व पक्षांमध्ये ठरलेल्या सर्व अटी व शर्तींचा समावेशक असून त्यामध्ये आजतागायत सर्व पक्षांच्या दरम्यान झालेल्या सर्व लेखी अथवा तोंडी समजूती व/वा करार यांचा समावेश केला गेला आहे. प्रस्तुत कराराच्या अनुषंगाने लिहुन द्यावयाच्या मुखत्यार पत्राचा देखील समावेश राहिल.

११.२ सदर मिळकतीचे विकसनानंतर अगर तत्पुर्वी सदर मिळकत, मिळकतीमधील बांधीव क्षेत्र अथवा सदर मिळकतीचे हिश्श्यांची खरेदीखते व अन्य दस्तऐवजे लिहुन घेणार यांचे अगर लिहुन घेणार हे सांगतील त्या व्यक्तिच्या नावाने, संस्थाच्या किंवा

मारुती नारायण पाटील

संयुक्त मु. धारिका

२६

ADJ.NO	२०	2024
Page/	२८	३५

ठ न न – २

दस्त क्रमांक ८७३/२०२४

२९ / १८०

कंपन्यांच्या नावाने लिहून देणार लिहून देतील. मात्र त्याचा खर्च लिहून घेणार अथवा त्यांचे नॉमिनीज हयांनी वर नमुद केल्याप्रमाणे करावयाचा आहे.

११.३ लिहून घेणार यांना सदर मिळकतीचे स्वत: विकसन करणे शक्य नसल्यास सदर मिळकतीचे संबंधाने विकसन अथवा विकसनाचे प्रक्रियेतील काही अधिकार जसे मुलभूत सुविधांचा विकास, बांधकाम, विपणन व बांधीव क्षेत्राचे लघुमुदत, मध्यम मुदत आणि दीर्घमुदत परवाने (Leave and License), भाडेकरार व विपननानंतरच्या सेवा व सुविधांचा पुरवठा व मिळकत व्यवस्थापन इत्यादी अधिकार हस्तांतरीत करण्याचा लिहून घेणार यांना सर्वस्वी हक्क व अधिकार राहिल.

११.४ सदर मिळकत व /अथवा त्यावरील भाग अथवा त्यामधील बांधकाम विकत घेणारे अंतिम ग्राहकांना मिळकत खरेदीसाठी कर्जाची आवश्यकता भासल्यास लिहून घेणार असे कर्ज घेणाऱ्या संबंधीत इसमांना कर्ज पुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थेस संबंधीत क्षेत्र तारण देण्यासाठी आवश्यक ते दस्त लिहून देतील अथवा अश्या दस्तांना संमती देऊ शकतील. तथापि अशाप्रकारे दस्त लिहून दिल्यास त्याबाबत लिहून देणार यांची परत फेडीबाबत कोणतीही वैयक्तीक जबाबदारी राहणार नाही.

११.५ लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान निश्चित झाल्यानुसार सदर मिळकतीचे विकसनाकामी लिहून देणार यांचे प्रतिनिधीत्व करण्याकरिता लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे नावे मुखत्यारपत्र लिहून व नोंदवून दयावयाचे आहे.

११.६ करारातील सर्व तरतुदी हया परस्परांपासून विभक्त असून करारातील एखादी तरतुद कोणत्याही कारणाने रद्द बातल ठरल्यास त्याचा कराराचे उर्वरित तरतुदींचे वैधतेवर परिणाम होणार नाही.

अनुच्छेद १२ : मुद्रांक :

ADJ.NO	20	2024
Page/	29	30

१२.१ सदर मिळकतीचे शासकीय मुल्यांकन रक्कम रुपये ३४,९०,२८,५००/- (अक्षरी रुपये चौतीस कोटी नव्वद लाख अठ्ठावीस हजार पाचशे रु. मात्र) इतके आहे. सदर मिळकतीचा एकूण मोबदला रक्कम रुपये ३०,२३,१४,०००/- (अक्षरी रूपये तीस कोटी तेवीस लाख चौदा हजार मात्र) आहे व लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना बांधून दयावयाचे क्षेत्राचा बांधकाम खर्च रक्कम रुपये —/- (अक्षरी रुपये — मात्र) असून एकूण मोबदल्याचे मुल्यांकन ३०,२३,१४,०००/- (अक्षरी रुपये तीस कोटी तेवीस लाख चौदा हजार मात्र) इतके आहे. त्यामुळे अधिकतम रक्कमेवर मुंबई मुद्रांक अधिनियमाचे तरतुदी नुसार मुद्रांक रक्कम रुपये १,०४,५१,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी चार लाख एक्कावन्न हजार पाचशे रु. मात्र) इतका अदा केलेला आहे.

टनन
दस्त क्रमांक ८३०३
२-१९८०

१२.२ प्रस्तुतचे दस्ताचे मुद्रांक, नोंदणी फी व इतर अनुषंगीक खर्च लिहून घेणार यांनी केलेले आहे/करावयाचे आहेत.

येणेप्रमाणे प्रस्तुतचा करारनामा आम्ही आमचे राजीखुषीने व स्वसंतोषाने वाचुन व समजावून घेऊन उत्तम अशा शारीरीक व मानसिक स्थितीत कोणत्याही धाक दडपणास बळी न पडता राजीखुषीने स्वसंतोषाने लिहुन दिला असे.

परिशिष्ट १

(सदर मिळकत)

मिळकतीचे वर्णन : मौजे पारसिक तालुका व जिल्हा ठाणे, रजिस्ट्रेशन डिस्ट्रिक्ट व सब-डिस्ट्रीक्ट ठाणे, ठाणे महानगरपालिका यांचे निवासी परिमंडळामधील जमीन मिळकत यांसी १) गट क्रमांक ८६, हिस्सा नंबर ५ यांसी क्षेत्र २१०० चौरस मीटर पैकी लिहून देणार यांचे विभक्त व तुटक हिश्श्याचे १३०० चौरस मीटर क्षेत्र, २) गट क्रमांक ८६, हिस्सा नंबर ६ यांसी क्षेत्र २१०० चौरस मीटर, ३) गट क्रमांक ८६, हिस्सा नंबर ७ यांसी क्षेत्र २१०० चौरस मीटर आणि ४) गट क्रमांक ८६, हिस्सा नंबर ८ यांसी क्षेत्र १६०० चौरस मीटर, असे एकूण क्षेत्र

मालती नरेश पाटील

मेघना नरेश पाटील

ADJ.NO	20	2024
Page/	30	36

७१०० चौरस मीटर म्हणजेच १) नगरभूमापन क्रमांक ११५/अ/३अ, २) नगरभूमापन क्रमांक ११५/अ/३ब आणि ३) नगरभूमापन क्रमांक ११५/ड यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे :-

ठाणे – २
दस्त क्रमांक ८३७३/२०२४
३ / १८०

पुर्वेस : सी.टी. सर्व्हे क्रमांक ११५/अ/२;

पश्चिमेस : सी.टी. सर्व्हे क्रमांक ११६;

उत्तरेस : नंदनवन होम्स गट क्रमांक ८१;

दक्षिणेस : ४५ मीटर रुंद डी.पी. रस्ता.

येणे प्रमाणे चतु:सिमांकित मिळकती जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप, वस्तुसह, वागवहिवाटीचे, जाण्यायेण्याचे हक्कासह व सर्व हक्क, तदंगभुत सर्व प्रकारची मालकी हक्कासह दरोबस्त मिळकत.

Collector of Stamps Thane (City)

THE SEAL OF THE SUB - REGISTRAR ठाणे – २ THANE - 2

विकसन करारनामा लिहून देणार प्रथम पक्षीय **सही**



१) श्रीमती मालती नरेश पाटील) मालती नरेश पाटील



२) श्री. आशिष नरेश पाटील)

ADJ.NO	२०	2024
Page/	३१	३७

३) प्रियांका नरेश पाटील)



ठ ने न – २
दस्त क्रमांक ९३५/२०२४
४९/१८०

४) श्रीमती मंजुळा सुरेश पाटील)

मंजुळा सु पाटील



५) श्री. रोशन सुरेश पाटील)



६) श्री. रोहन सुरेश पाटील)



साक्षीदार :

१) नाव.....M.P. Patil.....)

२) नाव.....)

विकसन करारनामा लिहून घेणार द्वितीय पक्षीय सही

श्री.नंदकुमार बाळकृष्ण साळवी प्रोप्रायटर)

मेसर्स सुनिता एंटरप्रायझेस)



ADJ.NO	२०	2024
Page/	32	३८

ठ न न – २
दस्त क्रमांक ९३७३/२०२४
नो / १८७

साक्षीदार :

१) नाव..... M.P.Patil मिलिंद प. पाटील.)

२) नाव..... Nilesh Patil निलेश पाटील)

पावती अ

आम्ही कारणे पावती लिहून देतो की, आम्हांस तुमच्याकडून सदर मिळकतीच्या आज रोजी झालेल्या करारनाम्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मोबदला **एकूण रक्कम रूपये ४,००,००,०००/- (अक्षरी रूपये चार कोटी मात्र)** निश्चित झालेला असून या रक्कमेपैकी बिनापरतावा रक्कम रुपये २,००,००,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी मात्र) पैकी १% टीडीएसकरीता वजावट करून उर्वरीत रक्कम रूपये १,९८,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठ्ठयाण्णव लाख मात्र) अनुच्छेद ४ मध्ये कलम ४.२ मध्ये तपशिलवार नमुद केल्याप्रमाणे मिळाली. तसेच, परतावा योग्य अनामत (Refundable Deposit) रक्कम रुपये २,००,००,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी मात्र) पैकी १% टीडीएसकरीता वजावट करून उर्वरीत रक्कम रूपये १,९८,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी अठ्ठयाण्णव लाख मात्र) अनुच्छेद ४ मध्ये कलम ४.३ मध्ये तपशिलवार नमुद केल्याप्रमाणे मिळाली.

पावती लिहून देणार **सही**

१) श्रीमती मालती नरेश पाटील) मालती नरेश पाटील

२) श्री. आशिष नरेश पाटील)

३) श्रीमती मंजुळा सुरेश पाटील) मंजुळा सु. पाटील

४) श्री. रोशन सुरेश पाटील)

ADJ.NO	20	2024
Page/	33	34

५) श्री. रोहन सुरेश पाटील)

साक्षीदार :

१) नाव .....)

२) नाव .....)

टनन – २
दस्त क्रमांक ३७३ / २०२४
४८ / १८०

सहपत्र – अ

रहिवासी सदनिका (विंग –सी १)

अ.क्र.	विंग	सदनिका क्र.	मजला	रेरा चटई क्षेत्र (चौरस फुट)
१.	सी १	१०१	१वा.	७५४.१३
२.	सी १	१०२	१वा	७४०.६७
३.	सी १	१०३	१वा	१८३.१८
४.	सी १	१०४	१वा	१७८.११
५.	सी १	१०५	१वा	७०२.०३
६.	सी १	१२०१	१२वा	७५४.१३
७.	सी १	१२०२	१२वा	७४०.६७
८.	सी १	१२०३	१२वा	१८३.१८
९.	सी १	१२०४	१२वा	१७८.११
१०.	सी १	१२०५	१२वा	७०२.०३
११.	सी १	१५०१	१५वा	७५४.१३
१२.	सी १	१५०२	१५वा	७४०.६७
१३.	सी १	१५०३	१५ वा	१८३.१८
१४.	सी १	१५०४	१५वा	१७८.११
१५.	सी १	१५०५	१५वा	७०२.०३
१६.	सी १	१८०१	१८वा	७५४.१३
१७.	सी १	१८०२	१८वा	७४०.६७

मालती नरेश पाटील

रोहन सु. पाटील